
बंजारा शिक्षण संस्था द्वारा संचलित

# कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, हनेगाव ता.देगलूर जि.नांदेड



# लोकमान्य टिळक सामाजिक सुधारणेचे विचार


**डॉ.मानवते उत्तम हुसनाजी**

प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख

# लोकमान्य टिळक सामाजिक सुधारणेचे विचार

## आधी सामाजिक की आधी राजकीय सुधारणा?

भारतातील ब्रिटिश सत्तेच्या काळात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाल्यावर सुशिक्षित लोकांत सामाजिक सुधारणासंबंधी विचार होऊ लागले होते. राजाराम मोहनरॉय यांचा ‘ब्राह्मो समाज’, दयानंद सरस्वती यांचा ‘आर्यसमाज’, न्या. रानडे यांचा ‘प्रार्थना समाज’ आणि जोतीबा फुले यांचा ‘सत्यशोधक समाज’ अशा काही संस्था-संघटना समाजात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करत होत्या. परिणामी त्या वेळेस काही सुधारणाही झाल्या. परंतु त्याचबरोबर आधी सामाजिक की राजकीय सुधारणा याबद्दलही वाद सुरू झाला.

सार्वजनिक क्षेत्रात काम करणा-या विचारवंतांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये सुधारणावादी आणि स्थितीवादी असे दोन गट पडले होते. रानडे, आगरकर हे सुधारणावादी गटाचे अग्रणी होते. तर टिळक, चिपळूणकर हे त्यांना विरोध करणारे आणि स्थितीवादी गटाचे नेते होते.

## राजकीय सुधारणा-

‘आधी सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा’ या वादात लोकमान्य टिळकांनी आधी राजकीय सुधारणांचे समर्थन केले आणि प्रत्यक्षातही राजकीय सुधारणांना आणि राजकीय प्रश्नांना प्राधान्य दिले. अर्थात लोकमान्य टिळकांना सामाजिक सुधारणा एकदम अमान्य होत्या असा त्याचा अर्थ नव्हता. उलटपक्षी लोकमान्य टिळकांना भारतातील सामाजिक प्रश्नांची पूर्ण जाणीव होती आणि सामाजिक सुधारणा झाल्या पाहिजेत असेही त्यांचे मत होते.

भारतात राजकीय सुधारणा झाल्या की सामाजिक सुधारणा सहजपणे होऊ शकतील असे त्यांचे मत होते. हा मुद्दा स्पष्ट करताना त्यांनी एका लेखात लिहिले आहे की, ‘‘जसा सुईच्या मागे दोरा तशाच प्रकारे राजकीय सुधारणानंतर सामाजिक सुधारणा आपोआप येत असतात. भरताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोक आवश्यकतेनुसार सामाजिक बदल घडवून आणतील’’ असे त्यांना वाटत होते. भारतीयांनी अगोदर स्वराज्याचा व स्वातंत्र्याचा लढा एकजुटीने लढावा. स्वातंत्र्य पदरात पाडून घ्यावे, त्यानंतर धर्मात व समाजात परिस्थितीनुसार हळूहळू परिवर्तन होतच असते असाही विचार त्यांनी मांडला.

## सामाजिक सुधारणा-

लोकमान्य टिळकांनी सामाजिक सुधारणांमध्ये खालील सुधारणांचे समर्थन केले आहे.

1) स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा, सहशिक्षणास मान्यता
2) बालविवाह बंद व्हावेत, मुलींचे वय 16 तर मुलांचे वय 21
3) विधवांनाही विवाह करण्याची परवानगी असावी.
4) विधवांचे मुंडन करू नये.
5) हिंदू समाजातील जातीभेद व अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे. कारण जात ही ईश्वरनिर्मित नाही तर मानवनिर्मित आहे.

6) हुंडाबंदी व्हावी

7) सामाजिक सुधारणांचा एक भाग म्हणून लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश शासनाने मंजूर केलेल्या संमती विधेयकाला विरोध केला.

लोकमान्य टिळकांनी सामाजिक सुधारणांची सुरूवातही केली होती असे म्हणता येईल. त्यांनी आपल्या मुलींना शिकविले तसेच त्यांचा बालविवाह लावला नव्हता.

## सामाजिक सुधारणांचे मार्ग -

लोकमान्य टिळकांचे सामाजिक सुधारणांचे मार्ग इतर विचारवंतांपेक्षा वेगळे होते. पाश्चात्यांचे अनुकरण करून या सुधारणा होणार नाहीत असे त्यांना वाटे.

1) सामाजिक सुधारणांचे लोकशिक्षण देणे.

2) लोकात जागृती निर्माण करणे.

3) सामाजिक सुधारणांसाठी ब्रिटिशांनी हस्तक्षेप करू नये.

4) सामाजिक सुधारणासाठी आधी स्वराज्य मिळवावे आणि नंतर भारतीयांनी निवडून दिलेल्या कायदेमंडळाने कायदे करावेत.

तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन लोकमान्य टिळकांनी आधी राजकीय सुधारणांचा, स्वराज्याचा आग्रह धरला होता.


धन्यवाद